# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परिपत्रक

विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाच्या संचालकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठात तीन स्तरांवर लैंगिक छळ प्रतिबंध समित्यांची स्थापना या पूर्वीच केली आहे. त्यानुसार सोलापूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर संकुलातील महिला शिक्षक व विद्यार्थिनी यांचे करिता श्रीमीती ठेंगे जे.डी. सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे अध्येक्षतेखाली लैंगिक छळ प्रतिबंध समिती कार्यान्वित करण्यात आली आहे तर विद्यापीठातील महिला अधिकारी व महिला कर्मचारी यांच्या करिता श्रीमती चोपडे ए.बी., सहाय्यक कुलसचिव, अभ्यासमंडळे विभाग यांचे अध्यक्षतेखाली लैंगिक छळ प्रतिबंध समितीचे गठन करण्यात आले आहे. तसेच डॉ. गवळी आर.एस., सहयोगी प्राध्यापक, भूशास्त्र संकुल यांचे अध्यक्षतेखाली विद्यापीठ पातळीवरील लैंगिक छळ प्रतिबंध समितीची स्थापना करण्यात आली असून, सदर समितीला अपिलीय समितीचे अधिकार प्राप्त आहेत.

विद्यापीठात/संलग्नित महाविद्यालयात लैंगिक छळ प्रतिबंधाबाबत जाणीवजागृती करण्याच्या दृष्टीकोनातून त्याचप्रमाणे याबाबतची तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया याची सविस्तर माहिती देण्याच्या उद्देशाने या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना मा. सर्वोच्च न्यायालयायने विशाखा प्रकरणातील निकालाच्या अनुषंगाने दिलेले निर्देश कळविण्यात येत आहेत.

**लैंगिक छळाची व्याख्याः**

स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी त्या महिला आहेत म्हणून दडपण आणणारे, असुरक्षितता, भय व तणाव तयार करणारे व त्यांच्या कार्यक्षमतेवर विपरित व प्रतिकूल परिणाम करणारे असे लैंगिक हेतूने प्रेरित असलेले, प्रत्यक्ष वा सूचक वर्तन म्हणजे लैंगिक छळ होय. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील गोष्टींचा समावेश लैंगिक छळामध्ये होईल.

१) स्त्रियांना शरम, संकोच, लाज व अवमान वाटेल असे वर्तन व हावभाव करणे वा तशी भाषा वापरणे, उदा. त्यांच्या शरीरास स्पर्श करणे, असभ्य कॉमेंटस मारणे, घाणेरडी शेरेबाजी आणि विनोद करणे, तशी पत्रे, ई-मेल पाठविणे, अश्लिल साहित्य/चित्रे दाखविणे, टक लावूण पाहणे, शिटया मारणे, धक्के मारणे, फुले फेकणे, विनय भंग करणे इ.

२) अध्यापन /संशोधन /नौकरी शैक्षणिक संस्थामधील अन्य उपक्रमातील सहभाग/लेखी, तोंडी प्रात्यक्षिक परीक्षेतील मूल्यमापन इत्यादींच्या संदर्भात स्त्रियांकडे संबंधाची मागणी करणे, त्यासाठी त्यांच्यावर प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष दडपण आणणे इ.

३) स्त्रियांना संकोच, शरम, भय, असुरक्षितता वाटेल अशा पध्दतीने लैंगिक आक्रमण करणे, उदा. आपल्या शारीरिक अवयवांचे त्यांचे समोर लैंगिक हेतूने प्रेरित होवून प्रदर्शन करणे इ.

**Definition of Sexual Harassment** :

For this purpose, sexual harassment includes such unwelcome sexually determined behavior (whether directly or by implication) as

a) physical contact and advances.
b) a demand or request for sexual favours:
c) sexually coloured remarks.

d) showing pornography.
e) any other unwelcome physical, verbal or non-verbal conduct of sexual nature.

मा. सर्वोच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे व त्यानुसार विद्यापीठास प्राप्त झालेले आदेश विचारात घेता लैंगिक छळवणूकी प्रकारांना प्रतिबंध करण्यात आला आहे. तेंव्हा असे प्रकार जर विद्यापीठ परिसरात/संलग्नित महाविद्यालयात घडत असतील तर याची माहिती संबंधित लैंगिक छळ प्रतिबंध समितीच्या अध्यक्षांना/कुलसचिवाना देण्याची आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या घटनाशी संबंधित तक्रार विद्यार्थिनी/महिला शिक्षक /महिला अधिकारी व कर्मचारी यांना करावयाची असल्यास, अशा तक्रारी सीलबंद लखोटयातून गोपनीय असे नमूद करून प्रत्यक्ष संबंधित समितीच्या अध्यक्ष किंवा मा.कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचेकडे पोहोच करावयाच्या आहेत. सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर **http://su.digitaluniversity.ac** वर circulars या मथळया खाली उपलब्ध करण्यात आले आहे. सदर बाबी अतिशय गोपनीय पध्दतीने हाताळणे जरूरीचे असल्याने या तक्रारी विद्यापीठाच्या आवक विभाग किंवा इतर कोणालाही देवू नयेत.

सोबत तक्रार दाखल करण्याबाबतचा नमूना जोडण्यात आला आहे. तेंव्हा या नमुन्याप्रमाणे महिला शिक्षक, महिला अधिकारी, महिला कर्मचारी व विद्यार्थिनी यांना अर्ज करता येतील.

सोबत :वरीलप्रमाणे

आदेशावरून,

**कुलसचिव**

सोविसो/सांख्यिकी/२०१३-१४/ 962
दि. - 4 APR 2014
प्रति,
प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये/
सर्व संचालक, विद्यापीठ परिसर संकुले,
सोलापूर विद्यापीठ,
**सोलापूर -४१३ २५५.**

# सोलापूर विद्यापीठ

सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

# SOLAPUR UNIVERSITY

Solapur Pune National Highway, Kegaon,
Solapur - 413 255 (Maharashtra)
Phone / Fax: 091-0217-2744770


संदर्भ:सोविसो/सांख्यिकी/२०१४-१५/ 2295 दि: 3 JUN 2014

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये, सर्व संकुले,
सोलापूर विद्यापी ठ, सोलापूर

**विषय : विद्यार्थिनी/महिला छेडछाडी बाबत..**

वाचा : १) पी. आय.एल. क्र. २०/२०१२ हायकोर्ट ऑन इटस ओन मोशन विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर
२) मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिस-२०१४/मतनिस/प्रशा-१/३६८८ दि. ०३/०५/२०१४

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, मा. उच्च न्यायालयाने दि. १२/१२/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील खालील नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने (मुद्दा क्र. ३ व ६) कार्यवाही करून सदरचा अहवाल शासनास सादर करावयाचा असल्याने त्वरित पूर्तता करावी.

१) प्रत्येक महाविद्यालयात महिलांच्या छेडछाडीच्या विरुध्द कोणती उपाय योजना करण्यात आलेली आहे याचा अहवाल विद्यापीठात आजच सादर करावा.

२) प्रत्येक शैक्षणिक संस्थामध्ये महिलांच्या छेडछाडीविरुध्द जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा महिला तक्रार मदत केंद्रात तक्रार दाखल करण्यात यावी. व याबाबतची अमलबजावणी करण्यात येत असल्याचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

३) **विद्यार्थिनी व महिलांच्या बाबतीत छेडछाड केल्याचे प्रकरण या महाविद्यालयात खपवून घेतले जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी,** अशा स्वरुपाचे सूचनेचे फलक महाविद्यालयात/विद्यापीठ संकुलात दर्शनी भागात लावावे व या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाची छायांकित प्रत आपल्या सूलभ संदर्भासाठी या सोबत जोडण्यात येत आहे.

४) महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आल्याची खात्री करुन तसे प्रमाणपत्र विद्यापीठास सादर करावे. तसेच प्रत्येक महाविद्यालयाने त्यांच्या कार्यालयात गठीत केलेल्या महिला तक्रार निवारण समितीची प्रत महाविद्यालयातील/संकुलातील फलकावर लावली असल्याची खात्री करुन अनुपालन अहवाल विद्यापीठास सादर करावा.

उक्तबाबीची कार्यवाही पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र पाच दिवसाच्या आत विद्यापीठास सादर करावा, जेणेकरुन शासनाला अनुपालन अहवाल पाठविणे शक्य होईल.

कळावे,

आपला विश्वासू,

(एस.के.माळी)
कुलसचिव

सोबत: वरीलप्रमाणे
प्रत: मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे